RNI New Delhi-MAHMAR/2011/41080

साप्ताहिक भारतभर वितरीत होणारे

# लेवा जगत

संपादक : शाम वसंत पाटील

Book - Post Parvana(Subs.5000)/L-218/RNP-BH-91/2023-2025

To,

वितरीत न झाल्यास परत पाठवण्याचा पत्ता :–
साप्ताहिक लेवा जगत
वंजारवाडी मु. पो. सावदा ता. रावेर, जि. जळगांव (महा.) ४२५ ५०२

पान-१ ■ वर्ष : १९ ■ अंक : ४३ ■ रविवार, ३ ते ९ ऑगस्ट २०२६ ■ पाने : ४ ■ किंमत-१०/-रु.

## सिद्धिविनायक मंदिरातील कथित देणगी घोटाळ्याचे चौकशीचे



मुंबई- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईतील प्रसिद्ध सिद्धिविनायक मंदिरातील कथित देणगी घोटाळ्याच्या चौकशीचे आदेश दिले आहेत. गेल्या पाच वर्षांतील देणगी आणि दान संकलनाची तपासणी होणार आहे. शिंदे गटाच्या सदा सरवणकर यांनी याबाबत तक्रार दिली होती. त्यानंतर आता मंदिराच्या ट्रस्टच्या आर्थिक नोंदींची सखोल चौकशी करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत.मुख्यमंत्र्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना या चौकशीचा तातडीने अहवाल देण्याची सूचना केली आहे.

# नशामुक्त युवा विकसित भारत अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी समन्वयाने काम करावे :

### केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे



जळगाव, दि.7 (जिमाका) : युवकांमधील वाढत्या व्यसनाधीनतेला आळा घालण्यासाठी जिल्ह्यासाठी व्यापक कृती आराखडा तयार करण्यात येत असून, शाळा-महाविद्यालयांपासून गाव-वॉर्ड पातळीपर्यंत विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. यासाठी 'माय भारत क्लब', स्वयंसेवी संस्था, शैक्षणिक संस्था, ग्रामपंचायती, पोलीस प्रशासन, आरोग्य विभाग तसेच सामाजिक व आध्यात्मिक संस्थांनी सहभागी होऊन सर्वांनी समन्वयाने काम करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन केंद्रीय युवा कार्यक्रम व क्रिडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी केले.

भारत सरकारच्या युवा कार्यक्रम व क्रिडा मंत्रालयाच्या 'नशामुक्त युवा विकसित भारत' या राष्ट्रव्यापी अभियानाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयात आज श्रीमती खडसे यांच्या अध्यक्षतेखाली दुरदृष्य प्रणालीद्वारे पूर्वतयारी संदर्भात घेण्यात आलेल्या आढावा बैठकीत उपस्थितांना मार्गदर्शन करतांना त्या बोलत होत्या. यावेळी जिल्हाधिकारी रोहन घुगे, जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी करीष्मा नायर, माय भारतचे जिल्हा युवा अधिकारी अभिषेक चवरे आदींसह संबंधीत विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

युवकांना व्यसनापासून दूर ठेवण्यासाठी 'प्रोटेक्ट, प्रिव्हेंट, रिकव्हर' या त्रिसूत्रीवर भर देण्यात येणार आहे. पालक संवाद, समुपदेशन, डिजिटल डिटॉक्स, करिअर मार्गदर्शन, क्रीडा, योग, पारंपरिक खेळ, वाचन चळवळ, कौशल्य विकास व रोजगार मार्गदर्शन आदी उपक्रमांद्वारे युवकांना सकारात्मक पर्याय उपलब्ध करून दिले जातील.दर महिन्याला चार रविवार विविध उपक्रमांसाठी निश्चित करण्याचा प्रस्ताव आहे. पहिल्या रविवारी तज्ञ मार्गदर्शन व जीवनकौशल्य प्रशिक्षण, दुसऱ्या रविवारी क्रीडा, योग, सायकल रॅली, ट्रेकिंग व सांस्कृतिक कार्यक्रम, तिसऱ्या रविवारी स्वच्छता मोहीम, वृक्षारोपण, रक्तदान व सामाजिक उपक्रम, तर चौथ्या रविवारी युवक महोत्सव, स्पर्धा, पुरस्कार व कौतुक सोहळ्याचे आयोजन करण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील सर्व गावांपर्यंत हे अभियान पोहोचविण्याचे उद्दिष्ट असून, प्रत्येक गावात 'माय भारत युवा क्लब' स्थापन करण्यावर भर दिला जाणार आहे. व्यसनाच्या विळख्यात सापडलेल्या किंवा धोक्याच्या उंबरठ्यावर असलेल्या युवकांना कौशल्य विकास, रोजगार, समुपदेशन व पुनर्वसनाच्या माध्यमातून मुख्य प्रवाहात आणले जाईल.जिल्ह्यातील अमली पदार्थविरोधी कारवाई अधिक तीव्र करण्यात आली आहे. संशयित बंद कारखाने, कुरिअर व टपाल व्यवस्था, प्रवासी बस तसेच इतर ठिकाणी तपासणी केली जात असून, अमली पदार्थांच्या पुरवठा साखळीचा शेवटपर्यंत माग काढण्यावर पोलिसांचा भर आहे. 'मिशन राईज' उपक्रमातून शाळा-महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांमध्ये अमली पदार्थांच्या दुष्परिणामांबाबत जनजागृती केली जाणार आहे.

## समाज विकास विभागाच्या योजनांसाठी उत्पन्न मर्यादा वाढवण्याच्या प्रस्तावाला मान्यता

उरण :सुनिल ठाकूर

पुणे महानगरपालिकेच्या समाज विकास विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी असलेली वार्षिक उत्पन्न मर्यादा वाढवण्याच्या प्रस्तावाला महिला व बाल कल्याण समितीने मान्यता दिली आहे.

महिला व बाल कल्याण समितीसमोर नगरसेविका स्वप्नाली नितीन पंडित यांनी याबाबत प्रस्ताव सादर केला होता. त्यावर प्रशासनाने सकारात्मक अभिप्राय दिला आहे.

महिला व बाल कल्याण योजनेअंतर्गत महिलांसाठी कौशल्य विकास, स्वयंरोजगार, अर्थसहाय्य, बचत गट प्रशिक्षण यासारख्या योजना राबविल्या जातात. या योजनांचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांचे वार्षिक उत्पन्न 1 लाख रुपयांच्या आत असावे अशी अट आहे.मात्र सध्याच्या महागाईच्या काळात 1 लाख वार्षिक उत्पन्न म्हणजे दरमहा केवळ 8 हजार 333 रुपये होते. त्यामुळे अनेक पात्र कुटुंबांना या योजनांचा लाभ मिळत नव्हता, अशी मांडणी प्रस्तावात करण्यात आली होती.महापालिका प्रशासनाने दिलेल्या अभिप्रायात म्हटले आहे की, राज्य शासनाच्या अनुसूचित जाती आणि अल्पसंख्याक विभागाच्या शिष्यवृत्ती योजनांमध्ये वार्षिक उत्पन्नाची मर्यादा 2.50 लाख रुपये आहे. त्याच धर्तीवर समाज विकास विभागाच्या योजनांसाठीही उत्पन्न मर्यादा 1 लाखावरून 2.50 लाख रुपये करावी.

कामगार कल्याण विभागाच्या मानधनाचा दाखला देताना प्रशासनाने म्हटले आहे की, अकुशल कामगाराला सध्या दरमहा 20 हजार 985 रुपये मानधन मिळते. त्याचे वार्षिक उत्पन्न 2.51 लाख रुपये होते. त्यामुळे 1 लाखाची मर्यादा कमी असल्याने अनेक नागरिक योजना लाभापासून वंचित राहत आहेत.महिला व बाल कल्याण समितीने हा प्रस्ताव मंजूर केला असून आता अंतिम मान्यतेसाठी तो स्थायी समिती मार्फत मुख्य सभेकडे जाणार आहे. उत्पन्न मर्यादा 1 लाखावरून 2.50 लाख रुपये झाल्यास अधिकाधिक महिला आणि कुटुंबांना समाज विकास विभागाच्या विविध योजनांचा लाभ घेता येणार आहे.या निर्णयामुळे पुणे शहरातील गरजू महिलांना कौशल्य प्रशिक्षण, स्वयंरोजगार आणि इतर आर्थिक सहाय्य योजना मिळवणे सुलभ होणार आहे, असे स्वप्नाली नितीन पंडित यांनी सांगितले

### डॉ. वर्षा पाटील वुमन्स कॉलेज ऑफ होम सायन्समध्ये

## राष्ट्रीय हातमाग दिन उत्साहात




जळगाव : भारतीय हातमाग परंपरेचे जतन, संवर्धन आणि विद्यार्थिनींमध्ये स्वदेशी उत्पादनांविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने डॉ. वर्षा पाटील वुमन्स कॉलेज ऑफ होम सायन्स महाविद्यालयात राष्ट्रीय हातमाग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

राष्ट्रीय हातमाग दिन हा भारताच्या समृद्ध वस्त्रोद्योग आणि विणकरांच्या योगदानाचा गौरव करणारा दिवस म्हणून ७ ऑगस्ट रोजी साजरा केला जातो. कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. उल्हास पाटील विधी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. नयना झोपे तसेच डॉ. वर्षा पाटील वुमन्स कॉलेज ऑफ होम सायन्सच्या प्राचार्य प्रा. डॉ. कविता देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विद्यार्थिनींनी स्वतः तयार केलेल्या बांधणीच्या साड्या, हातमागावर तयार केलेल्या साड्या, आकर्षक रांगोळ्या तसेच ज्वेलरी यांचे सुंदर प्रदर्शन भरविण्यात आले होते.प्रदर्शनाला भेट देणाऱ्या मान्यवरांनी विद्यार्थिनींच्या कलाकुसरीचे आणि सर्जनशीलतेचे कौतुक केले. विद्यार्थिनींनी सादर केलेल्या विविध वस्तूंमधून भारतीय हातमाग परंपरेचे सौंदर्य आणि कौशल्य प्रभावीपणे अधोरेखित झाले. उपस्थितांनी विद्यार्थिनींना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देत अशा उपक्रमांमुळे पारंपरिक कला आणि स्थानिक उद्योगांना प्रोत्साहन मिळत असल्याचे मत व्यक्त केले.यावेळी प्राचार्य प्रा. डॉ. कविता देशमुख यांनी राष्ट्रीय हातमाग दिनाचे महत्त्व, भारतीय विणकरांचे योगदान तसेच हातमाग उद्योगासमोरील संधी आणि आव्हाने याविषयी मार्गदर्शन केले.

## मोतीबिंदूमुक्त यावल तालुका अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद

### दोन महिन्यांत ८,५५२ रुग्णांची तपासणी; ६८९ शस्त्रक्रिया यशस्वी

जळगाव लेवाजगत प्रतिनिधी : गोदावरी फाउंडेशन संचलित डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या ह.भ.प. जगन्नाथ महाराज अंजाळेकर नेत्रालयातर्फे राबविण्यात येत असलेल्या मोतीबिंदूमुक्त यावल तालुका या विशेष अभियानाला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. एकूण ८ हजार ५५२ रुग्णांची ओपीडी तपासणी करण्यात येवून ६८९ शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आल्या आहेत.



१० जूनपासून सुरू झालेल्या या मोहिमेमुळे यावल तालुक्यातील ग्रामीण भागातील हजारो नागरिकांना त्यांच्या गावातच दर्जेदार नेत्रसेवा उपलब्ध झाली असून मोतीबिंदूमुळे होणारे अंधत्व रोखण्यासाठी प्रभावी पाऊल उचलले गेले आहे. जागतिक दृष्टिदान दिनाच्या पार्श्वभूमीवर सुरू करण्यात आलेल्या या अभियानांतर्गत यावल तालुक्यातील विविध गावांमध्ये नेत्रतपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे. शिबिरांमध्ये डोळ्यांच्या आजारांसह इतर विविध आजारांचीही तपासणी करण्यात येत असून आवश्यकतेनुसार तज्ञांकडून उपचार व आरोग्यविषयक मार्गदर्शन दिले जात आहे.अभियानाच्या सुरुवातीपासून आजपर्यंत एकूण ८ हजार ५५२ रुग्णांची ओपीडी तपासणी करण्यात आली आहे. यापैकी २ हजार ९२२ रुग्णांना आयपीडीमध्ये दाखल करून उपचार देण्यात आले. तपासणीदरम्यान मोतीबिंदू व इतर नेत्रविकार निदर्शनास आलेल्या रुग्णांवर यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आल्या. आतापर्यंत ३७९ मेजर आणि ३१० मायनर अशा एकूण ६८९ शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आल्या आहेत.या अभियानाचा सर्वाधिक लाभ आर्थिकदृष्ट्या दुर्बल, गरजू व ज्येष्ठ नागरिकांना होत आहे.

### केंद्रीय राज्यमंत्री रक्षाताई खडसे यांच्या सन्मानार्थ

## रावेरात भव्य मूक मोर्चा;

### महिलांच्या सन्मानासाठी नागरिकांची एकजूट

रावेर लेवाजगत प्रतिनिधी-

केंद्रीय राज्यमंत्री मा. श्रीमती रक्षाताई खडसे यांच्याविषयी करण्यात आलेल्या कथित आक्षेपार्ह वक्तव्याच्या निषेधार्थ बुधवारी (दि. ५ ऑगस्ट) रावेर येथे समस्त नागरिकांच्या वतीने भव्य मूक मोर्चाचे आयोजन करण्यात आले. या मोर्चाला रावेर तालुक्यासह परिसरातील विविध स्तरांतील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



मूक मोर्चामध्ये केळी उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले. याशिवाय महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक तसेच विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी उपस्थित राहून महिलांच्या सन्मानासाठी आपली एकजूट दर्शविली.

मोर्चानंतर तहसीलदारांना निवेदन देण्यात आले. त्यामध्ये संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करून कथित आक्षेपार्ह वक्तव्य करणाऱ्या विजय चौधरी (नंदुरबार) यांच्याविरुद्ध कायद्यानुसार कठोर कारवाई करून फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली.

यावेळी उपस्थित नागरिकांनी महिलांचा अपमान कोणत्याही परिस्थितीत सहन केला जाणार नसल्याची ठाम भूमिका व्यक्त केली. तसेच रक्षाताई खडसे यांच्याविषयी करण्यात आलेल्या कथित आक्षेपार्ह वक्तव्याचा तीव्र निषेध नोंदविण्यात आला.

महिलांच्या सन्मानाचे रक्षण करणे ही संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी असून, अशा प्रकारच्या वक्तव्यांविरोधात समाज एकसंघ असल्याचा संदेश या शांततापूर्ण मूक मोर्चातून देण्यात आला.


विशेष बाब म्हणजे, मोर्चा नियोजित वेळेनुसार सुरू झाल्याने अनेक नागरिकांना वेळेत पोहोचता आले नाही. त्यामुळे तहसील कार्यालयात निवेदन सादर झाल्यानंतरही मोठ्या संख्येने नागरिक मोर्चात सहभागी होण्यासाठी दाखल झाले. त्यामुळे सुरुवातीच्या उपस्थितीपेक्षा नंतर सहभागी झालेल्यांची संख्या अधिक असल्याचे चित्र पाहायला मिळाले.

### कुऱ्हा परिसरात ढगफुटीसदृश

## पावसाचा कहर;

### तात्काळ पंचनामे करून नुकसानग्रस्तांना भरपाई द्या : आमदार एकनाथराव खडसे

मुक्ताईनगर,लेवाजगत प्रतिनिधीः मुक्ताईनगर तालुक्यातील कुऱ्हा परिसरात २९ व ३० जुलै रोजी झालेल्या ढगफुटीसदृश अतिवृष्टीमुळे शेती, घरे आणि नदीकाठच्या जमिनींचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर विधानपरिषद सदस्य तथा माजी मंत्री आमदार एकनाथराव खडसे यांनी जळगाव जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करून बाधित भागाचे तात्काळ पंचनामे करण्याचे तसेच नुकसानग्रस्त शेतकरी व नागरिकांना त्वरित आर्थिक मदत आणि भरपाई देण्याची मागणी केली आहे.



आमदार खडसे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मुसळधार पावसामुळे कुऱ्हा परिसरातील नदी-नाल्यांना आलेल्या पुराचे पाणी शेतांमध्ये आणि वस्त्यांमध्ये शिरल्याने ढगफुटीसदृश परिस्थिती निर्माण झाली. नदीकाठच्या अनेक शेतजमिनी वाहून गेल्या असून, मोठ्या प्रमाणात गाळ साचला आहे. अनेक शेतांमध्ये पाणी साचून राहिल्याने उभी पिके पिवळी पडली असून ती नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. अनेक घरांमध्येही पाणी शिरल्याने संसारोपयोगी वस्तूंचे नुकसान झाले आहे.

इतकी गंभीर परिस्थिती निर्माण होऊनही संबंधित विभागाकडून अद्याप नुकसानीचे पंचनामे करण्यात आले नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली आहे. महसूल, कृषी व संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन शेती, घरे व इतर नुकसानीचे पंचनामे करावेत .

## रावेर आगाराला मिळाल्या ५ नव्या बस;



लेवाजगत न्यूज रावेरः- आगाराला नवीन बस मिळविण्यासाठी आमदार अमोल जावळे यांच्यासह आपणही प्रयत्न व पाठपुरावा केला आहे. आम्ही दोघेही भाजपचे आमदार असून पक्ष सत्तेत आहे. रावेर तालुक्याचा सर्वांगीण विकास हाच आमचा अजेंडा आहे. त्यामुळे बस मिळविण्यामागे कोणताही श्रेयवादाचा प्रश्न नाही, असा निवाळा विधान परिषदेचे आमदार नंदकिशोर महाजन यांनी दिला.

रावेर आगारात राजमाता जिजाऊ योजनेंतर्गत प्राप्त झालेल्या पाच नवीन बसच्या लोकार्पण सोहळ्यात ते बोलत होते.

आमदार अमोल जावळे यांनी यापूर्वी रावेर आगाराला १० बस मिळाव्यात यासाठी शासनाकडे प्रयत्न व पाठपुरावा केला होता. त्यावेळी पाच बस मिळाल्या होत्या. आगारातील बसची कमतरता व प्रवाशांची वाढती मागणी लक्षात घेऊन आमदार जावळे यांचा पाठपुरावा सुरू होता. दरम्यान, २६ जुलै रोजी आमदार नंदकिशोर महाजन यांनी एसटी महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकांना पत्र देऊन आणखी पाच बसची मागणी केली होती. त्यानुसार राजमाता जिजाऊ योजनेंतर्गत रावेर आगाराला पाच नवीन बस प्राप्त झाल्या.

या बसचा लोकार्पण सोहळा आ. नंदकिशोर महाजन यांच्या हस्ते पार पडला. यावेळी भाजपचे ज्येष्ठ नेते सुरेश धनके, नगराध्यक्ष संगीता महाजन, बाजार समितीचे सभापती प्रल्हाद पाटील, माजी नगराध्यक्ष पद्माकर महाजन, नगरसेवक राजेश शिंदे, राजेंद्र चौधरी, अरुण अस्वार, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष अरुण शिंदे, लोकसभा क्षेत्र संयोजक सुनील पाटील यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जनावरांचा अपघाती मृत्यू झाल्यास ८० हजारांपर्यंत भरपाई

### गाय, म्हैस, शेळी-मेंढीसह १० जनावरांचा समावेश; पशुधन विमा योजनेला प्रशासकीय व वित्तीय मान्यता

प्रतिनिधी । मुंबई

राज्यातील पशुपालक शेतकऱ्यांना मोठा दिलासा देणारा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. 'राष्ट्रीय पशुधन अभियान' अंतर्गत राज्यात पशुधन विमा योजना राबविण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे. अपघात, नैसर्गिक आपत्ती किंवा साथीच्या रोगांमुळे पशुधनाचा मृत्यू झाल्यास शेतकऱ्यांना आर्थिक भरपाई मिळणार आहे. याबाबतची माहिती पर्यावरण व पशुसंवर्धनमंत्री पंकजा मुंडे यांनी दिली.

हवामानातील अनपेक्षित बदल, दुष्काळ, पूर, वीज पडणे, विषबाधा, सर्पदंश तसेच लम्पी स्कीनसारख्या साथीच्या रोगांमुळे पशुपालकांचे मोठे आर्थिक नुकसान होते. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना आर्थिक संकटातून सावरण्यास मदत करणे, त्यांना कर्जबाजारीपणापासून वाचवणे आणि तातडीने नुकसानभरपाई उपलब्ध करून देणे, हा या योजनेचा उद्देश आहे.

या योजनेअंतर्गत एका कुटुंबातील जास्तीत जास्त १० पशुधन घटकांचा विमा काढता येणार आहे. त्यापेक्षा अधिक जनावरांचा विमा काढायचा असल्यास अतिरिक्त प्रीमियमची रक्कम लाभार्थ्याला स्वतः भरावी लागणार आहे. विम्याच्या एकूण प्रीमियमपैकी ८५ टक्के रक्कम केंद्र व राज्य सरकारकडून अनुदान म्हणून देण्यात येणार असून, केंद्र व राज्याचा अनुदानातील हिस्सा ६०:४० या प्रमाणात राहणार आहे. त्यामुळे लाभार्थ्याला केवळ १५ टक्के प्रीमियमची रक्कम भरावी लागणार आहे.या योजनेत दुधाळ गाय व बैलासाठी ७० हजार रुपयांपर्यंत, म्हैस व रेड्यासाठी ८० हजार रुपयांपर्यंत, तर शेळी किंवा मेंढीसाठी ७ हजार रुपयांपर्यंत विमा संरक्षण मिळणार आहे. शेतकऱ्यांना एक, दोन किंवा तीन वर्षांसाठी पशुधनाचा विमा काढता येणार असून, एक वर्षासाठी ४.३० टक्के, दोन वर्षांसाठी ७.५० टक्के आणि तीन वर्षांसाठी १०.५० टक्के प्रीमियम दर निश्चित करण्यात आला आहे.

## शिरपूरजवळ भरधाव बसने दुचाकीला चिरडले;

### 'शेवभाजीचं पार्सल आणतोय, पोळ्या तयार ठेव' आईशी शेवटचा संवाद; वाढदिवशीच मुलाचा मृत्यू शिरपूरजवळ भरधाव बसने दुचाकीला चिरडले; दोघा जिवलग मित्रांचा दुर्दैवी अंत; मित्रासाठी १५ किमी अनवाणी चालत आला सागर

प्रतिनिधी । शिरपूर

'आई, मी केक आणि शेवभाजीचं पार्सल घेऊन येतोय. तू फक्त पोळ्या करून ठेव' वाढदिवसानिमित्त मित्रांसोबत आनंद साजरा करून घरी परतणाऱ्या चेतन गुजरचा आईशी झालेला हा शेवटचा संवाद ठरला. काही वेळातच काळाने त्याच्यावर घाला घातला. शिरपूर-चोपडा रस्त्यावर भरधाव एसटी बसने दुचाकीला दिलेल्या भीषण धडकेत चेतनसह त्याचा जिवलग मित्र कल्पेश पाटील यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेने भाटपुरासह परिसरावर शोककळा पसरली आहे.

ही हृदयद्रावक घटना बुधवारी (दि. ५) रात्री साडेनऊ वाजेच्या सुमारास शिरपूर-चोपडा रस्त्यावरीलप्रणवटेक्सटाइलसमोर घडली. चेतन योगराज गुजर (वय १९) आणि कल्पेश नितीन पाटील (वय २०, दोघेही रा. भाटपुरा) अशी मृत मित्रांची नावे आहेत. दोघेही जिवलग मित्र होते.

चेतनचा ५ ऑगस्ट रोजी १९वा वाढदिवस होता. नाशिक येथे डिप्लोमा पूर्ण केल्यानंतर तो नोकरीला रुजू झाला होता. वाढदिवस साजरा करण्यासाठी तो भाटपुरा येथे आला होता. मित्रांनी शिरपूर शहरातील तपन पटेल मार्गावर त्याचा वाढदिवस साजरा केला. त्यानंतर दोघेही दुचाकीवरून घरी परतत होते.

घरी परतताना चेतनने आईला फोन करून, 'केक आणि शेवभाजीचं पार्सल घेऊन येतोय, तू पोळ्या करून ठेव,' असे सांगितले होते. वडिलांनाही लवकर घरी येण्याचे त्याने आश्वासन दिले होते. मात्र, घरी परतण्यापूर्वीच काळाने त्याला हिरावून नेले.

रात्री साडेनऊच्या सुमारास प्रणव टेक्सटाइलजवळ एमएच १४ बीटी २३४९ क्रमांकाच्या भरधाव बसने त्यांच्या एमएच १८ बीपी ११५५ क्रमांकाच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. ओव्हरटेक करताना बसचालकाचा दुचाकीला धक्का लागल्याची प्राथमिक माहिती आहे. अपघात इतका भीषण होता की दोघांचाही मृत्यू झाला.